# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ५९/२०२३ दिनांक :- १८/०२/२०२३

## चोरी करून नेपाळ येथे पलायन करण्याच्या बेतात असलेल्या आरोपीतास अटक करुन ५ लाख ६५ हजार रुपये रक्कम हस्तगत.
## तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

---

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १३.०२.२०२३ रोजी दुपारी ०२.३० ते ०३.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी नामे सौ. सरोजा मुन्नालाल यादव, वय ४० वर्षे, रा.रुम नं. २०४ शिवसाई अपार्टमेंट ठाकुर विद्यालय जवळ, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व यांच्या राहते घरामधील बॅगेतील ७ लाख रुपयांची रोख रक्कम आरोपी नामे नवीन बलराम बिस्ट, वय २७ वर्षे, रा. रुम नं. २०२, नेस्ट अपा. विनायक नगर, मोरेगाव, नालासोपारा पुर्व मुळ रा. वार्ड नं. ९, कोठार सरनोली, जि. दारचुला नेपाळ हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरिता चोरी करुन पळुन गेल्याने फिर्यादी यांनी तुळींज पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीवरुन गु.रजी.नं. १२९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयातील आरोपी नामे नवीन बलराम बिस्ट याचा शोध घेण्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार यांना वरिष्ठ पोलीस अधिका-याकडून सूचना देण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी सुरत विमानतळावरुन नेपाळ येथे पलायन करण्याच्या तयारीत असताना, विमानतळावरिल सुरक्षा अधिकारी यांची मदत घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडून गुन्ह्यात चोरी केलेली रोख रक्कम रु.५ लाख ६५ हजार हस्तगत केली आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उ.निरी. बाळासाहेब बांदल, सहा.पो.उप.निरी. शिवानंद सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, उमेश वरठा, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, शशी पाटील, बागुल, पो.अंम. छपरीबन, राऊत यांनी केलेली आहे.

----oooo----